महाराष्ट्र शासन

# सक्षम अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी ठाणे यांचे कार्यालय
## (भुसंपादन शाखा)

दुरध्वनी क्रमांक -०२२-२५३४५११० Email Id- sdothane@gmail.com

क्र.टिडी/टे-५/भूसं/कावि/रेल्वे/रा.रा.पो.ब.ग.क्र.११/एसआर-३५/२०२० दिनांक: ०१/०९/२०२०

## नमुना-१

### खाजगी क्षेत्रातील जमीन खाजगी वाटाघाटीद्वारे थेट खरेदी पद्धतीने ताब्यात घेण्याबाबत जाहीर नोटीस

ज्या अर्थी, समादेशक, राज्य राखीव पोलीस बल, गट क्र.११, नवी मुंबई कॅम्प बाळेगांव पो-वाकळण व्हाया मुंब्रा,ता.जि.ठाणे.४००६१२ यांनी **"राज्य राखीव पोलीस बल गट क्र.११ नवी मुंबई"** या सार्वजनिक प्रयोजनाकरिता शासन निर्णय, महसूल व वन विभाग क्र. संकीर्ण०३/२०१५/प्र.क्र.३४/अ-२, दिनांक: १२ मे, २०१५ व दिनांक: ३० सप्टेंबर, २०१५ मधील तरतुदीस अनुसरून खाजगी क्षेत्रातील जमीन खाजगी वाटाघाटीद्वारे थेट खरेदी पद्धतीने **"राज्य राखीव पोलीस बल गट क्र.११ नवी मुंबई"** यांचे नावे घेण्याबाबत प्रस्ताव मा. जिल्हाधिकारी, ठाणे यांचेकडे सादर केला आहे;

आणि ज्या अर्थी, मा. जिल्हाधिकारी, ठाणे यांचे आदेश क्रमांक उजि/भूसं(समन्वय)/मौ.बाळेगांव/रा.रा.पो.ब.ग.क्र.११/कावि-२९६/२०२० दि.२२/०६/२०२० अन्वये उक्त प्रस्तावासंबंधी उक्त शासन निर्णय दिनांक: १२ मे २०१५ तसेच शासनाच्या दिनांक:०६/१२/२०१६ रोजीच्या पत्रान्वये सदर प्रकल्पासाठी खाजगी जमिन थेट खरेदी पध्दतीने ताब्यात घेण्याबाबतची कार्यपध्दती निश्चित केलेली आहे व त्या प्रमाणे कार्यवाही करण्याबाबत निर्देश दिले आहेत;

त्या अर्थी, आता

१. उक्त शासन निर्णय आणि शासन परिपत्रकातील तरतुदीनुसार, मी, **अविनाश शिंदे, सक्षम प्राधिकारी तथा उपविभागीय अधिकारी ठाणे** याद्वारे,

एक) अनुसूची-एक मध्ये नमूद खाजगी क्षेत्रातील जमीन खाजगी वाटाघाटीद्वारे थेट खरेदी पद्धतीने राज्य राखीव पोलीस बल गट क्र.११ नवी मुंबई यांचे नावे घेण्याबाबत जाहीर नोटीस प्रसिद्ध करीत आहे; आणि

दोन) प्रकल्पासाठी जमीन थेट खरेदी घेताना जिल्हास्तरीय समिती मार्फत भूसंपादन कायदा २०१३ मधील कलम २६ ते ३० च्या व शेड्युल-१ च्या तरतुदीनुसार संबंधित जमिनीसाठी परिगणित होणाऱ्या एकूण मोबदल्याच्या रक्कमेवर २५% रक्कम वाढीव देऊन, मोबदला निश्चित करण्यात येईल. आणि,

तीन) संबंधित भूधारकांकडून शासनाच्या प्रचलित धोरणाप्रमाणे खाजगी जमीन वाटाघाटीद्वारे राज्य राखीव पोलीस बल गट क्र.११ नवी मुंबई यांचे नावे खरेदी देण्यास स्वेच्छेने तयार असल्याबाबत व

जिल्हास्तरीय समितीने निश्चित केलेला मोबदला संपूर्णत: व अंतिमरित्या स्विकारण्यास तयार असल्याबाबतची संमतीपत्रे (विकल्प) मागवित आहे.

२. संबंधित भूधारकांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यानंतर विहित नमुन्यातील संमतीपत्रे (विकल्प) सक्षम प्राधिकारी तथा उपविभागीय अधिकारी ठाणे यांच्या ठाणे स्थित जिल्हाधिकारी कार्यालयाच्या इमारतीत दुसऱ्या मजल्यावरील कक्ष क्र.२१७ मध्ये दाखल करावीत..

३. संमतीपत्राचा (विकल्प) विहित नमुना सक्षम प्राधिकारी तथा उपविभागीय अधिकारी ठाणे यांच्या कार्यालयामध्ये उपलब्ध आहे. तसेच सदर नमुना या कार्यालयामार्फत / राज्य राखीव पोलीस बल गट क्र.११ चे प्राधिकृत अधिकाऱ्यामार्फत भूधारकांना उपलब्ध करुन देण्यात येईल.

४. सदर प्रकल्पासाठी निश्चित करण्यात आलेल्या क्षेत्राच्या आराखड्याची प्रत सक्षम प्राधिकारी तथा उपविभागीय अधिकारी ठाणे यांच्या कार्यालयामध्ये व समादेशक, राज्य राखीव पोलीस बल, गट क्र.११, नवी मुंबई कॅम्प बाळेगांव पो-वाकळण व्हाया मुंब्रा, ता.जि.ठाणे.४००६१२ यांचे कार्यालयामध्ये कार्यालयीन वेळेत भूधारकांना किंवा हितसंबंधित व्यक्तींना तसेच जनतेस निरीक्षणासाठी खुली ठेवण्यात आली आहे.

## अनुसूची-एक

## खरेदी द्यावयाच्या जमिनिचा तपशील

**मौजे- बाळेगांव** **तालुका: ठाणे** **जिल्हा: ठाणे**

| अ.क्र. | भूमापन क्रमांक | संपादित करावयाचे क्षेत्र (हे.आर) |
|---|---|---|
| १ | १०९ | ०-३५-९० |
| २ | ११४ | ०-३३-९० |
| ३ | ११५ | ०-२५-०० |
| ४ | ११६ | ०-०९-६० |
| ५ | ११७ | ०-१५-४० |
| ६ | ११९ | ०-१३-१० |
| ७ | १२१ | ०-१७-४०<br>पो.ख. ०-००-८० |
| ८ | १२२ | ०-२७-८० |
| ९ | १२३ /१ | ०-१८-९०<br>पो.ख. ०-००-८० |
| १० | १२३ /२ | ०-१५-७०<br>पो.ख. ०-००-२० |
| ११ | १२३ /३ | ०-२२-३०<br>पो.ख. ०-०१-५० |
| १२ | १२५ /१ | ०-४९-१०<br>पो.ख. ०-०१-०० |

| | | |
|---|---|---|
| १३ | १४६/१ | ०-१६-४०<br>पो.ख. ०-००-८० |
| १४ | १४६/२ | ०-१६-८०<br>पो.ख. ०-०१-२० |
| १५ | १४७ | ०-११-९०<br>पो.ख. ०-०१-०० |
| १६ | १४८ | ०-०८-१०<br>पो.ख. ०-०१-०० |
| १७ | १४९/१ | ०-०९-१० |
| १८ | १४९/२ | ०-१३-४० |
| १९ | १५० | ०-१२-६० |
| २० | १५१ | ०-०४-०० |
| २१ | १५२ | ०-०८-६० |
| २२ | १५३ | ०-०६-८० |
| २३ | १५४ | ०-०१-०० |
| २४ | १५५ | ०-०८-८० |
| २५ | १५६ | ०-२६-८० |
| २६ | १५७ | ०-२०-५०<br>पो.ख. ०-००-८० |
| **एकुण क्षेत्र** | | **४-५८-००** |

**सही/-xxx**
**(अविनाश शिंदे)**
**सक्षम प्राधिकारी तथा**
**उपविभागीय अधिकारी ठाणे**

दिनांक : ०१/०९/२०२०
ठिकाण: ठाणे